महाराष्ट्र शासन

पशुसंवर्धन विभाग

पशुसंवर्धन आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, औंध, पुणे-४११ ०६७.

सरळसेवेने भरावयाच्या पदांची जाहिरात

वेबसाईट www.mahapariksha.gov.in

जाहिरात क्रमांक :- एनजीओ-५(४)/(प्र.क्र.१०४९)/१४२/२०१८/ पर्स-१, पुणे-६७, दिनांक : २८/२/ २०१९

शासनाने स्थापन केलेल्या महापरीक्षा कक्षाकडून सर्व विभागाकडील/खात्याकडील गट-क व गट-ड पदावरील भरती प्रक्रिया एकत्रितरित्या तातडीने राबविणेचा निर्णय घेतलेला आहे. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२०/ आपुक, दिनांक १६.५.२०१८ आणि कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन पत्र क्र. पविआ-२०१५/प्र.क्र. ५७१/ पदुम-३, दिनांक ०४.१२.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेनुसार पशुसंवर्धन विभागाकडील राज्यस्तरीय गट-क "पशुधन पर्यवेक्षक" व गट-ड "परिचर" या संवर्गाची सरळसेवेची पदे भरण्यासाठी खाली नमुद केलेल्या रिक्त पदाकरिता पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्यात येत आहेत. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरावयाची सुविधा www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. तसेच सदर जाहिरात पशुसंवर्धन विभागाच्या www.ahd.maharashtra.gov.in आणि www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**-:: परिक्षेचे वेळापत्रक ::-**

| अ.क्र | ऑनलाईन पध्दतीने अर्ज व परीक्षा शुल्क भरण्याची सुरवात | ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक |
|---|---|---|
| १ | ०४/०३/२०१९ रात्री १०.०० वाजल्यापासून | दिनांक २४.०३.२०१९ रात्री ११.५९ पर्यन्त |
| २ | ऑनलाईन परिक्षेचा दिनांक | महापरीक्षा पोर्टलवर स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येईल. |

भरती प्रकिया संदर्भातील सर्व कार्यक्रम, कार्यक्रमातील बदल सुचना वगैरे www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येतील. उमेदवारांशी कोणताही पत्रव्यवहार करण्यात येणार नसुन या संकेतस्थळावर वेळोवेळी प्रसारित करण्यात येणाऱ्या सूचनांची दखल घेऊन त्यानुसार कार्यवाही करण्याची दक्षता उमेदवारांनी घ्यावयाची आहे.

**पद क्र. १ : पदनाम-पशुधन पर्यवेक्षक (गट-क) वेतनश्रेणी :- ५२००-२०२०० (ग्रेड वेतन रु.२४००/-)**

या संवर्गात भरती करावयाच्या पदांची संख्या-**१४९**

पशुधन पर्यवेक्षक या संवर्गात भरावयाच्या पदांच्या आरक्षणाचा तपशील :-

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०० | ०३ | ०१ | ०२ | ०१ | ०१ | ०० | १७ | ०७ | ०५ | ०८ | ४५ |
| माजी सैनिक१५ % | ०० | ०२ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०९ | ०४ | ०२ | ०४ | २२ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०७ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ |
| खेळाडू ५ % | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०१ | ०७ |
| अंशकालीन १० % | ०० | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०६ | ०२ | ०२ | ०३ | १५ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| सर्वसाधारण | ०० | ०३ | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०१ | १७ | ०९ | ०४ | १० | ५० |
| एकुण | ०० | ११ | ०२ | ०६ | ०३ | ०२ | ०१ | ५७ | २४ | १५ | २८ | १४९ |
| दिव्यांग | एकुण पदे ०५ (अस्थिव्यंग ०२ पदे व कर्णबधिर- ०३ पदे) (सुनिश्चित पदे- OL & HH) | | | | | | | | | | | |

**(२) पद क्र.२ : पदनाम-परिचर (गट-ड) वेतनश्रेणी :- ४४४०-७४४० (ग्रेड वेतन रु.१३००/-)**

परिचर या संवर्गात भरावयाच्या पदांचा विभागनिहाय तपशील खालील प्रमाणे आहे.

**(अ) पुणे विभाग** - भरती करावयाच्या पदांची संख्या-१४३

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०५ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०० | ०७ | ०७ | ०४ | ११ | ४३ |
| माजी सैनिक १५ % | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०४ | ०३ | ०२ | ०५ | २० |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| खेळाडू ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०२ | ०६ |
| अंशकालीन १० % | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०२ | ०२ | ०१ | ०४ | १५ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०४ | ०३ | ०३ | ०३ | ०१ | ०३ | ०१ | ०९ | ०९ | ०५ | ११ | ५२ |
| एकुण | १५ | ०७ | ०७ | ०७ | ०२ | ०७ | ०१ | २४ | २३ | १४ | ३६ | १४३ |
| दिव्यांग | एकुण पदे ०४ (अंध ०२ पदे व कर्णबधिर- ०२ पदे) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | | |

**(ब) मुंबई विभाग** - भरती करावयाच्या पदांची संख्या-६७

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०३ | ०२ | ०८ | २० |
| माजी सैनिक १५ % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०४ | १० |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| खेळाडू ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०१ | ०२ |
| अंशकालीन १० % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०३ | ०७ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०२ | ०२ | ०२ | ०० | ०२ | ०० | ०० | ०३ | ०३ | ०३ | ०८ | २५ |
| एकुण | ०६ | ०४ | ०३ | ०० | ०३ | ०० | ०० | ०७ | ११ | ०७ | २६ | ६७ |
| दिव्यांग | एकुण पदे ०२ (अल्पदृष्टी ०१ पद व कर्णबधिर- ०१ पद ) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | | |

**(क) नाशिक विभाग** - भरती करावयाच्या पदांची संख्या-९३

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०९ | ०५ | ०३ | ०३ | ३० |
| माजी सैनिक १५ % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०४ | ०२ | ०१ | ०२ | १२ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०१ |
| खेळाडू ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०३ |
| अंशकालीन १० % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ०९ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०४ | ०१ | ०२ | ०१ | ०२ | ०२ | ०२ | १० | ०४ | ०४ | ०३ | ३५ |
| एकुण | ०९ | ०५ | ०३ | ०२ | ०३ | ०३ | ०४ | २९ | १५ | ०९ | ११ | ९३ |
| दिव्यांग | एकुण पदे ०३ (अस्थिव्यंग- ०२ पदे व कर्णबधिर- ०१ पद) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | | |

## (ड) औरंगाबाद विभाग - भरती करावयाच्या पदांची संख्या-८७

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०२ | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०७ | ०२ | ०३ | ०९ | २९ |
| माजी सैनिक १५ % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०३ | ०१ | ०१ | ०५ | १२ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०३ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ |
| खेळाडू ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०३ |
| अंशकालीन १० % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०३ | ०९ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०८ | ०४ | ०४ | ०८ | ३० |
| एकुण | ०५ | ०५ | ०० | ०२ | ०२ | ०२ | ०२ | २२ | ०८ | ०९ | ३० | ८७ |
| दिव्यांग | | एकुण पदे ०१ (अंध-०१ पद ) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | |

## (इ) लातूर विभाग - भरती करावयाच्या पदांची संख्या-२२

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०२ | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०७ |
| माजी सैनिक १५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| अंशकालीन १० % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०० | ०२ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०१ | ०२ | ०२ | ०१ | ०० | १० |
| एकुण | ०५ | ०१ | ०० | ०१ | ०२ | ०० | ०१ | ०६ | ०४ | ०२ | ०० | २२ |
| दिव्यांग | | एकुण पदे ०१ (कर्णबधिर- ०१ पद ) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | |

## (फ) अमरावती विभाग - भरती करावयाच्या पदांची संख्या- ६९

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०३ | ०२ | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०० | ०५ | ०३ | ०२ | ०२ | २० |
| माजी सैनिक १५ % | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०३ | ०२ | ०१ | ०१ | ११ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०३ |
| अंशकालीन १० % | ०१ | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०२ | ०१ | ०१ | ०० | ०६ |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०३ | ०१ | ०० | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०५ | ०३ | ०३ | ०४ | २६ |
| एकुण | ११ | ०५ | ०० | ०३ | ०४ | ०३ | ०१ | १७ | ११ | ०७ | ०७ | ६९ |
| दिव्यांग | एकुण पदे ०२ (अस्थिव्यंग-०१ पद व कर्णबधिर-०१ पद ) (सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | | |

**(ग) नागपूर विभाग -** भरती करावयाच्या पदांची संख्या- ९९

| समांतर आरक्षण | अनु. जाती | अनु. जमाती | विमुक्त जाती (अ) | भटक्या जमाती (ब) | भटक्या जमाती (क) | भटक्या जमाती (ड) | विशेष मागास प्रवर्ग | इतर मागास वर्ग | एसईबीसी | ईडब्ल्यूएस | अराखीव (खुला) | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला ३० % | ०५ | ०२ | ०१ | ०१ | ०२ | ०१ | ०० | ०४ | ०५ | ०३ | ०७ | ३१ |
| माजी सैनिक १५ % | ०२ | ०१ | ०० | ०१ | ०१ | ०० | ०० | ०२ | ०२ | ०२ | ०४ | १५ |
| प्रकल्पग्रस्त ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| भुकंपग्रस्त २ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| खेळाडू ५ % | ०१ | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०१ | ०१ | ०१ | ०१ | ०५ |
| अंशकालीन १० % | ०२ | ०१ | ०० | ०० | ०१ | ०० | ०० | ०१ | ०२ | ०१ | ०२ | १० |
| अनाथ १ % | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० | ०० |
| सर्वसाधारण | ०४ | ०२ | ०२ | ०२ | ०१ | ०२ | ०१ | ०३ | ०५ | ०२ | ०९ | ३३ |
| एकुण | १५ | ०६ | ०३ | ०४ | ०५ | ०३ | ०१ | १२ | १६ | १० | २४ | ९९ |
| दिव्यांग | एकुण पदे-०३ (अंध- ०१ पद, अस्थिव्यंग- ०१ पद व कर्णबधिर- ०१ पद )(सुनिश्चित पदे- OA, OL, HH, B & LV) | | | | | | | | | | | |

स्पर्धात्मक परीक्षा स्थगित करणे, रद्द करणे, अंशतः बदल करणे, पदांच्या एकुण व संवर्गांनिहाय संख्येमध्ये बदल करण्याचे अधिकार आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ यांना राहतील तसेच उपरोक्त एकुण पदे दिनांक ३१.१२.२०१९ पर्यन्त भरावयाची असून, संदर्भीत पात्र उमेदवारांची निवड यादी जाहिर झाल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या पदावर उमेदवारांना गुणांकानुसार प्रथम नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्यास आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ हे सक्षम राहतील आणि तो त्यांचा निर्णय अंतिम असेल. याबाबत कोणताही दावा करता येणार नाही. दर्शविण्यात आलेल्या समांतर आरक्षणाचा पात्र उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्या पदावर राखीव प्रवर्गातील इतर पात्र उमेदवारांचा शासनाचे विहीत नियमानुसार विचार केला जाईल.

पदभरती प्रक्रिये संदर्भात वाद, तक्रारीबाबत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ यांना अंतिम निर्णय घेण्याचे अधिकार राहतील.

उमेदवारांचे अर्ज फक्त ऑनलाईन (Online) पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना, शैक्षणिक प्रमाणपत्रे/कागदपत्रे, अन्य प्रमाणपत्रे जोडणे आवश्यक नाही. तथापि, ऑनलाईन अर्जामध्ये उमेदवाराने त्यांच्या पात्रतेनुसार काळजीपुर्वक संपूर्ण, अचुक व खरी माहिती भरणे आवश्यक आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहील्यास व त्यामुळे भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. याबाबत उमेदवाराची तक्रार विचारात घेतली जाणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यानंतर बदलता येणार नाही. त्यामुळे ऑनलाईन अर्जाची माहिती उमेदवारांनी काळजीपर्वक / विचारपुर्वक भरावी. जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या सर्व अटी, शैक्षणिक अर्हता व मागणीनुसार आरक्षण, वयोमर्यादा शिथिलीकरण वगैरेची पात्रता तपासूनच ऑनलाईन अर्ज भरावा.

शासन निर्णय सामान्य प्रशासन विभाग क्र. प्राणिमं-१२१४/प्र.क्र. (४३/१४)/१३-अ, दि.०५.०६.२०१४ नुसार गट-क मधील कोणत्याही पदासाठी उमेदवारांची मौखीक परीक्षा घेण्यात येणार नसल्याने भरती प्रक्रियेत पात्र झालेल्या गट-क व गट-ड मधील उमेदवारांची, त्यांनी ऑनलाईन परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांच्याच आधारे गुणवत्तेनुसार अंतिम निवड केली जाईल व अशा उमेदवारांना शैक्षणिक व इतर संबंधातील मुळ प्रमाणपत्रे/ कागदपत्रे तपासणी करीता पडताळणी समितीकडे उपलब्ध करुन द्यावी लागतील अन्यथा त्यांचा अंतिम निवडीसाठी विचार केला जाणार नाही.

**(१) शैक्षणिक अर्हता :-**

खाली नमूद केलेली शैक्षणिक अर्हता जाहिरातीच्या दिनांकास प्रमाणपत्रासहीत पुर्ण धारण करणे आवश्यक आहे.

| अ क्र | पदाचे नाव | वय | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | १८ वर्ष ते ३८ वर्ष | पशुधन पर्यवेक्षक या पदासाठी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे.<br>(i) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा ( इयत्ता १० वी ) (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेला असावा आणि |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | (ii) पशुसंवर्धन आयुक्तालयाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाने चालविलेला किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला पशुधन पर्यवेक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा,<br>किंवा<br>(iii) महाराष्ट्र राज्याच्या तंत्रशिक्षण परिक्षा मंडळामार्फत किंवा महाराष्ट्र राज्यातील सांविधानिक कृषि विद्यापीठाने किंवा महाराष्ट्र राज्यातील समतुल्य विद्यापीठाने चालविलेला दोन वर्षाचा दुग्धव्यवसाय व्यवस्थापन व पशुसंवर्धन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा,<br>किंवा<br>(iv) महाराष्ट्र पशु व मत्स्य विज्ञान विद्यापीठ, नागपूर यांच्यामार्फत चालविण्यात येणारा दोन वर्षाचा पशुधन व्यवस्थापन व दुग्धोत्पादन पदविका अभ्यासक्रम उत्तीर्ण केलेला असावा,<br>किंवा<br>(v) महाराष्ट्र राज्यातील संविधानिक कृषि विद्यापीठाची किंवा त्यास समतुल्य विद्यापीठाची बी.व्ही.एस.सी. किंवा बी.व्ही.एस.सी. अँड ॲनिमल हजबंड्री ही पदवी धारण केलेली असावी.<br>(कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग,अधिसूचना दिनांक १० सप्टेंबर, २०१३, गट-क पशुधन पर्यवेक्षक पदाचे (सेवा प्रवेश) नियम २०१३ नुसार) |
| २ | परिचर (गट-ड) | १८ वर्षे ते ३८ वर्षे | परिचर या पदासाठी उमेदवाराची शैक्षणिक अर्हता खालील प्रमाणे असणे आवश्यक आहे.<br>(i) उमेदवार महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परिक्षा (एस.एस.सी) उत्तीर्ण झालेला असावा.<br>(सामान्य प्रशासन अधिसूचना दिनांक ६ जून, २०१७, गट-ड पदाचे (सेवा प्रवेश) नियम २०१७ नुसार) |

वरील तक्त्यामध्ये नमूद केलेली पशुधन पर्यवेक्षक या संवर्गाची पात्रता ही कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, अधिसूचना दिनांक १० सप्टेंबर, २०१३, (सेवा प्रवेश) नियम २०१३ नुसार व परिचर (गट-ड) या संवर्गाची सामान्य प्रशासन अधिसूचना दिनांक ६ जून, २०१७, (सेवा प्रवेश) नियम २०१७ नुसार राहील.

**(२) वयोमर्यादेतील सवलत :-**

वयोमर्यादेकरीता उमेदवाराचे वय हे जाहिरातीच्या दिनांकास असणारे वय विचारात घेतले जाईल.

१. खुला/सर्वसाधारण प्रवर्ग : ३८ वर्षे (शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दि.२५.०४.२०१६)

२. मागासवर्गीय उमेदवार : ४३ वर्षे (शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.४०४/कार्या.१२ दि. २५.०४.२०१६)

३. अपंग/प्रकल्पग्रस्त/भुकंपग्रस्त/ सन १९९१ चे जनगणना/ सन १९९४ नंतरचे निवडणुक कर्मचारी /अपंग माजी सैनिक/ स्वातंत्र्य संग्राम सैनिकाचे नाम निर्देशित पाल्यः ४५ वर्षे

४. खेळाडू : ५ वर्ष सवलत (खुला प्रवर्ग ३८ + ५ व मागासवर्गीय प्रवर्ग ४३ वर्षे )

५. अंशकालीन कर्मचारी : ५५ वर्षे

**(३) संगणक अर्हता :-**

MS-CIT ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक आहे. तथापि, शासन निर्णय, माहिती तंत्रज्ञान (सामान्य प्रशासन विभाग) क्र. मातंस-२०१२/प्र.क्र.२७७/३९ दिनांक ०४.०२.२०१३ मध्ये नमूद केलेल्या संगणक/माहिती तंत्रज्ञान विषयक ८६ प्रमाणपत्रांपैकी, कोणतेही एक प्रमाणपत्र धारक असावा.

**(३) वेतनश्रेणी :-**

**पशुधन पर्यवेक्षक (गट-क)** - रु.५२००-२०२०० + ग्रेड वेतन रु. २४००/-

**परिचर (गट-ड)** - रु. ४४४०-७४४० + ग्रेड वेतन रु. १३००/-

**(४) नेमणुकीच्या सर्वसाधारण अटी :-**

१. उमेदवार हा महाराष्ट्रातील रहिवासी असावा (अधिवास प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक) अर्जदाराने महाराष्ट्र राज्याचा रहिवासी असल्याचे शासनाने प्राधिकृत केलेल्या सक्षम अधिका-यांचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

२. सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवारास मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

३. विहित वयोमर्यादेतील इच्छूक शासकीय, निमशासकीय सेवेतील कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालय प्रमुखांच्या परवानगीने विहीत मार्गाने विहित मुदतीत अधिकृत संकेतस्थळावरुन ऑनलाईन भरावे. अशा परवानगीची प्रत उमेदवारांकडे असणे आवश्यक आहे व त्याबाबतची कागदपत्रे छाननीच्या वेळी सादर करावी.

**(५) परीक्षेचे स्वरुप :- ऑनलाईन परिक्षा.**

**परिक्षेचा कालावधी :- ९० मिनिटे**

| अ.क्र. | पद | विषय | भाषा | प्रश्न संख्या | गुण |
|---|---|---|---|---|---|
| १ | पशुधन पर्यवेक्षक | इंग्रजी | इंग्रजी | १० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | मराठी | मराठी | २० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | सामान्य ज्ञान | मराठी | २० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | बुध्दीमत्ता चाचणी | मराठी | १० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | पशुसंवर्धन | मराठी | ४० | प्रती प्रश्न १ गुण |
| २ | परिचर | इंग्रजी | इंग्रजी | २० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | मराठी | मराठी | ३० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | सामान्य ज्ञान | मराठी | ३० | प्रती प्रश्न १ गुण |
| | | बुध्दीमत्ता चाचणी | मराठी | २० | प्रती प्रश्न १ गुण |

**(६) ऑनलाईन परिक्षेच्या प्रश्नपत्रिकेचे स्वरुप व कार्यक्रम.**

१. ऑनलाईन परीक्षेची प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ, बहूपर्यायी स्वरुपाची राहील. सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. बहूपर्यायी प्रश्नांसाठी दिलेल्या चार पर्यायांपैकी एकच पर्याय निवडावा.

| | | |
|---|---|---|
| **अभ्यासक्रम** | | |
| **१) पदाचे नांव : पशुधन पर्यवेक्षक** | | |
| 1 | Section name –English | |
| | a | Topic 1-English (as Lower Language) -As per the 12th Std. syllabus<br>**Similar Word, Opposite Word, Common Vocabulary, Sentence Structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.** |
| | b | Topic 2-Marathi (as Higher Language)-As per the 12th Std. syllabus<br>समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द तसेच सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे. |
| | c | Topic 3-General Knowledge - चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भुगोल, भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राजव्यवस्था तसेच पर्यावरण. |
| | | Topic 4- Logical Ability- As per the 12th Std. level<br>उमेदवार किती लवकर व अचुकपणे विचार करून शकतो हे आजमवण्यासाठी प्रश्न. |
| | d | Topic 5-Animal Husbandry:-<br>Economically important species of Livestock & poultry in India<br>Various Indigenous breeds of Cattle, Buffalo, Sheep, Goat, Pigs, Horses & Poultry birds in India & in Maharashtra |

| | | |
|---|---|---|
| | | Livestock Husbandry Practices in Maharashtra<br>Livestock & Poultry breeding including Cross breeding, Artificial insemination, handling of frozen semen etc.<br>Devices used for Identification of Animals, Importance of record keeping<br>Livestock and poultry management<br>Animal nutrition:<br>Fodder & feeds for livestock & poultry<br>Common dieses of Livestock & Poultry in Maharashtra<br>Important statistics of livestock & poultry in Maharashtra<br>Importance of livestock in agricultural economy.<br>Topic 5- पशुसंवर्धन :-<br>देशातील आर्थिकदृष्टया महत्वाच्या पशुधन आणि कुक्कुट पक्ष्यांची माहिती<br>देशातील आणि महाराष्ट्र राज्यातील गोवंशीय, म्हैसवर्गीय, शेळया, मेंढया, घोडे, कुक्कुट पक्षी यांच्या देशी जातींची माहिती<br>महाराष्ट्र राज्यातील पशुधन व्यवस्थापन/ पशुपालन पध्दतीची माहिती<br>पशुधन आणि कुक्कुट पक्षांची पैदास, कृत्रिम रेतन, गोठीत रेतमात्रांची हाताळणी इत्यादी<br>पशुधनाची ओळख पटविण्यासाठी वापरली जाणारी संसाधने, आवश्यक बाबींच्या नोंदी करणे व अभिलेख जतन करण्याचे महत्व,<br>पशुधन आणि कुक्कुट व्यवस्थापन<br>पशुपोषण व आहार<br>वैरण, चारा व पशु /पक्षी खाद्य<br>महाराष्ट्र राज्यातील पशुधन आणि कुक्कुट पक्ष्यांचे सर्वसाधारण रोग<br>महाराष्ट्र राज्यातील पशुधन व कुक्कुट यांचेशी निगडीत महत्वाची सांख्यिकी माहिती<br>पशुधनाचे कृषि अर्थव्यवस्थेमध्ये महत्व |

| **२) पदाचे नांव : परिचर** | | |
|---|---|---|
| 1 | Section name –English | |
| | a | Topic 1-English - As per the 10th Std. syllabus - **Similar Word, Opposite Word, Common Vocabulary, Sentence Structure, Grammar, Use of Idioms and phrases & their meaning and comprehension of passage.** |
| | b | Topic 2-Marathi - As per the 10th Std. syllabus-<br>**समानार्थी शब्द, विरुध्दार्थी शब्द तसेच सर्वसामान्य शब्दसंग्रह, वाक्यरचना, व्याकरण, म्हणी व वाक्प्रचार यांचा अर्थ आणि उपयोग तसेच उताऱ्यावरील प्रश्नांची उत्तरे.** |
| | c | Topic 3-General Knowledge -<br>चालू घडामोडी (जागतिक तसेच भारतातील), इतिहास विशेषत: महाराष्ट्राचा, महाराष्ट्राचा भुगोल, भारतीय अर्थव्यवस्था, भारतीय राजव्यवस्था तसेच पर्यावरण. |
| | | Topic 4- Logical Ability- As per the 10th Std. level- उमेदवार किती लवकर व अचुकपणे विचार करुन शकतो हे आजमवण्यासाठी प्रश्न. |

**(७) परीक्षा शुल्क :-** सदर भरती प्रक्रियेत खालीलप्रमाणे परीक्षा शुल्क आकारले जाणार असून सदर परीक्षा शुल्क हे नापरतावा राहील.

**परीक्षा शुल्क.**

| अ.क्र. | पदनाम/संवर्ग | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|---|
| १ | १. पशुधन पर्यवेक्षक (गट-क)<br>२. परिचर (गट-ड) | रक्कम रु. ३००/-<br>रक्कम रु. ३००/- | रक्कम रु. १५०/-<br>रक्कम रु. १५०/- |

१. माजी सैनिक व अपंग उमेदवारांना परीक्षा शुल्क माफ आहे.

२. उमेदवार आपापल्या सोईनुसार भरणा करु शकतात. भरणा करण्याकरिता फक्त ऑनलाईन (इंटरनेट बँकींग, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, भीम UPI) पर्याय उपलब्ध आहेत.

३. उमेदवाराला वीज पुरवठा किंवा इंटरनेट सेवा खंडीत झाल्यामुळे शुल्क भरणा करता आला नाही तर पुन्हा लॉगीन करुन शुल्क भरणा प्रक्रिया पुर्ण करावी.

४. शुल्क भरणा झाल्यावर उमेदवाराला "भरणा यशस्वी" म्हणुन संदेश मिळेल आणि झालेल्या व्यवहाराची सविस्तर माहिती अर्जामध्ये आपोआप अंतर्भुत होईल.

## (८) ऑनलाईन अर्ज भरण्याची कार्यपध्दती व सूचना :

| अर्ज भरण्याकरीता सुचना :- | |
|---|---|
| १ | उमेदवाराला www.mahapariksha.gov.in या संकेतस्थळावर लॉगइन करावे लागेल. उमेदवाराने आपल्या उजव्याबाजूला असलेल्या "सूचना" या पर्यायावर क्लिक करावे. तिथून उमेदवाराला थेट नोंदणीच्या पोर्टलवर नेले जाईल. पहिल्यांदाच नोंदणी केली जात असल्यास उमेदवाराने नोंदणीच्या पर्यायावर क्लिक करुन युजरनेम, पासवर्ड आणि ईमेल आयडी टाकावा. उमेदवाराला त्यानंतर त्याच्या / तिच्या प्रमाणित ईमेल आयडीवर सक्रीयतेची लिंक मिळेल जी त्यांच्या साईनअपशी संबंधित असेल. उमेदवाराने त्याचे / तिचे खाते सक्रीय करण्यासाठी त्याच्या / तिच्या ईमेल आयडीवर मिळालेल्या सक्रीयतेच्या लिंकवर क्लिक करावे. (Activation लिंक ही २ दिवसाकरीता activate असेल) उमेदवाराने त्याची/ तिची लॉगइनची माहिती गोपनीय ठेवावी. एकदा खाते सक्रीय झाले की, उमेदवाराला त्यांच्या नोंदणी पोर्टलचे युजरनेम आणि पासवर्ड वापरुन केव्हाही लॉगऑन होता येईल.<br>टीप :- USERNAME आणि PASSWORD जतन करण्याची जबाबदारी उमेदवाराची असेल. |
| २ | उमेदवाराचे नांव, वडीलांचे, पतीचे नांव, आडनाव, वडीलांचे नांव, आईचे नांव, जन्मदिनांक,भ्रमणध्वनी क्रमांक, छायाचित्र, स्वाक्षरी ही मुलभूत माहिती आहे जी उमेदवाराला सविस्तर द्यावी लागेल. |
| ३ | छायाचित्र आणि स्वाक्षरी अपलोड करण्यासंबंधी माहिती- कृपया उंची आणि रुंदी प्रत्येकी २०० pixel असलेले छायाचित्र स्कॅन करुन अपलोड करा आणि अर्जामध्ये अपलोड करा. प्रतिमेची उंची ६० pixel आणि रुंदी १४० pixel असावी. प्रतिमेचे आकारमान ३ kb ते ५० kb च्या दरम्यान असावे. (टिप:- उमेदवाराचे अलिकडील छायाचित्र (फोटोग्राफ) अपलोड करणे आवश्यक आहे.) |
| ४ | पत्ता टाकण्यासाठी उमेदवाराने आपल्या पत्त्याचा प्रकार निश्चित करावा. उदा.कायमस्वरुपी पत्ता, तात्पुरता पत्ता किंवा दोन्ही आणि त्यानुसार आपले गांव, पोस्ट ऑफिस, राज्य, जिल्हा, पिनकोड इ. सहित माहिती भरावी. |
| ५ | त्यानंतर उमेदवाराने अतिरीक्त माहितीच्या पर्यायावर क्लिक करावे आणि आपल्या जात प्रवर्गाबद्दल माहिती भरावी. उमेदवाराकडे जात प्रमाणपत्र असल्यास त्याबद्दल विचारणा केली जाईल. असल्यास ड्रॉपडाऊन मधुन त्याने/ तिने आपला जात प्रवर्ग निवडावा. उमेदवाराने आपल्या जात प्रवर्गाची निवड करण्याआधी जाहिरात वाचणे अपेक्षित आहे. ऑनलाईन पध्दतीने आवेतन अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने विस्तृत जाहिरातीचे काळजीपुर्वक वाचन करावे. जाहिरातीतील सूचना पुर्णपणे वाचूनच ऑनलाईन अर्ज भरण्याची दक्षता उमेदवारांनी स्वतः घ्यावी. |
| ६ | ज्यांच्याकडे आधारक्रमांक आहे त्यांनी तत्संबधी माहिती भरावी, तसेच उमेदवाराने आधारक्रमांक/ आधार नोंदणी क्रमांक याबद्दलची माहिती द्यावी. समांतर आरक्षण (लागू असल्यास) त्यासंबधीची माहिती द्यावी लागेल. |
| ७ | तसेच मराठी भाषेतील प्राविण्य, MS-CIT प्रमाणपत्र, आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य, अपंगत्वाचा प्रकार (लागू असल्यास) या सबंधिची माहिती द्यावी लागेल. |
| ८ | शैक्षणिक माहितीच्या जागी उमेदवाराने आपली सविस्तर शैक्षणिक माहिती भरावी. शैक्षणिक पात्रतेमध्ये जाहिरातीमध्ये नमूद केल्याप्रमाणे माहिती देणे अनिवार्य आहे. तरच आपणास त्या पदासाठी अर्ज करता येईल. |
| ९ | एकदा शैक्षणिक तपशील प्रविष्ट केला की अर्जदारास "पुढे" या बटणावर क्लिक करावे लागेल, त्या बटणावर क्लिक केल्यानंतर अर्जदाराकडून पुष्टीची विनंती केली जाईल की त्यांनी ते बटण क्लिक केल्यास मागील तपशील संपादित करण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| १० | आता उमेदवारास पदाची निवड करावी लागेल १.पशुधन पर्यवेक्षक/Livestock Supervisor<br>२.परिचर / Attendant. |

| | |
|---|---|
| | उमेदवारास परिचर या पदासाठी एका विभागाची निवड करावी लागेल.<br>उमेदवार एकाच अर्जामध्ये पात्र असलेल्या (जाहिरातीमध्ये नमूद केलेल्या शैक्षणिक पात्रता, वयाची अर्हता आणि अन्य अर्हता विचारात घेऊन ) सर्व पदांना (इच्छुक असल्यास) अर्ज करु शकतो, त्यामुळे पदानुसार वेगळा अर्ज भरण्याची आवश्यकता नाही. |
| ११ | त्यानंतर उमेदवारास सर्व पदांसाठी आवश्यक असलेली पात्रतेबददलची माहिती देऊन ती सेव्ह करणे आवश्यक आहे. |
| १२ | उमेदवाराने नोंदणी अर्जामध्ये दिल्याप्रमाणे परीक्षा केंद्राकरीता तीन प्राधान्यक्रम निवडू शकतो. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायांपैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास, उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी केंद्र नेमून देण्यात येईल. |
| १३ | उमेदवाराने सगळया नियम व अटी वाचून मान्यता दर्शविण्यासाठी दिलेल्या जागी क्लिक करावे. त्यानंतर ऑनलाईन पध्दतीने (इंटरनेट बँकीग, क्रेडिट कार्ड, नेट बँकिंग, भीम UPI ) आवश्यक तो परीक्षा शुल्क भरणा करावा. मान्यता दर्शविल्यानंतरच अर्ज दाखल करण्यासाठीचा "सबमिट" हा पर्याय उपलब्ध होईल. उमेदवाराला त्याचा अर्ज डाऊनलोड किंवा प्रिंट करण्याचा पर्याय असेल. |
| १४ | ऑनलाईन अर्ज स्विकारण्याच्या अंतिम तारखेस मध्यरात्री ११.५९ वाजता संकेतस्थळावरील लिंक बंद केली जाईल. |
| १५ | जर कोणत्याही उमेदवाराने एकापेक्षा अधिक लॉगिन आयडीसह नोंदणी केली असेल तर उमेदवारांची पहिली यशस्वी नोंदणी फक्त पुढील प्रक्रिया जसे हॉल तिकिट, परीक्षेत उपस्थिती, गुणवत्ता यादी आणि अन्य संबंधित प्रक्रियांसाठी विचारात घेण्यात येईल. कोणत्याही डुप्लीकेट नोंदणीस अवैध नोंदणी मानली जाईल आणि कोणत्याही प्रकारचे पैसे परतफेड केले जाणार नाहीत. उमेदवाराव्दारे प्रथम यशस्वी नोंदणीमध्ये काही चुकीची माहिती देण्यात आली असेल तर कृपया या विषयाबद्दलची योग्य प्रक्रीया जाणुन घेण्यासाठी enquiry@mahapariksha.gov.in वर लिहावे किंवा टोल फ्री नं. १८००-३०००-७७६६ या क्रमांकावर कॉल करा.<br>नोंद :- नोंदणी मधील तपशील जसे की वापरकर्ता नांव (USERNAME), ई-मेल आयडी, प्रवर्ग आरक्षण (लागू समांतर किंवा प्रवर्ग आरक्षण ) पसंतीचे स्थान, जन्मतारीख, उमेदवाराचे छायाचित्र (फोटोग्राफ) आणि स्वाक्षरी, परिचर पदासाठी निवड केलेला विभाग इत्यादी फॉर्म सादर केल्यानंतर बदलण्याची परवानगी दिली जाणार नाही. |
| **अर्जातील माहितीचे पुर्वावलोकन :-** | |
| १ | युजरनेम आणि पासवर्ड वापरुन लॉगइन केल्यावर उमेदवार आपला संक्षिप्त अर्ज पाहु शकेल. |
| २ | अर्ज प्रिंट करण्यासाठी "प्रिंट प्रिव्हयू" या पर्यायावर क्लिक करा.<br>नोंदः उमेदवाराने आपला PDF स्वरुपातील अर्ज, परीक्षा प्रवेशपत्र संपूर्ण भरती प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत स्वत:जवळ ठेवावा. |
| **महत्वाच्या सूचना** | |
| | १) उमेदवारास देण्यात आलेले परीक्षा केंद्र उमेदवाराने अर्ज सबमिट केल्यानंतर बदलण्यात येणार नाही.<br>२) परीक्षा केंद्र किंवा परीक्षा शहर बदलण्याची विनंती कोणत्याही परिस्थीतीमध्ये (वैद्यकिय किंवा इतर कारणांसाठी) स्विकारली जाणार नाही. उमेदवाराने त्याची प्रवासाची व्यवस्था त्यानुसार आधीच ठरवावी.<br>३) उमेदवार जे वेगवेगळे विभाग/वेगवगळया पदांसाठी अर्ज करत असतील, अशा उमेदवारांनी सर्व विभाग/पदे याकरीता सारखी परीक्षा शहरांची निवड करावी. अन्यथा वेगवेगळया पदांसाठीच्या परीक्षेसाठी वेगवेगळे परीक्षा केंद्र/ शहर मिळण्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>४) उमेदवाराने आपल्या अर्जात उपलब्ध करुन देण्यात आलेल्या तीनही पसंतीक्रमाच्या यादीतील प्रत्येकी एका पर्यायाची निवड करणे आवश्यक आहे. तीनही पसंतीक्रमात उमेदवाराने निवडलेल्या पर्यायापैकी एकही परीक्षा केंद्र उपलब्ध नसल्यास उमेदवारास उपलब्ध केंद्रापैकी जवळील परीक्षा केंद्र नेमून देण्यात येईल.<br>५) उमेदवाराने एका पदासाठी फक्त एकदाच अर्ज करावा, जर एका उमेदवाराने एकापेक्षा अधिक अर्ज केलेले आहेत असे आढळून आले तर अशा उमेदवाराची उमेदवारी रद्द केली जाईल.<br>६) उमेदवाराने भरणा केलेले परिक्षा शुल्क कोणत्याही परिस्थितीमध्ये (अनेकदा अर्ज करणे, अर्ज चुकणे, काही कारणास्तव परीक्षेस बसू न शकणे इत्यादी अशा कारणांसाठी) परत केले जाणार नाही. |

(९) सर्वसाधारण सुचना (कार्यपध्दती, अटी व शर्ती)

१. ऑनलाईन अर्ज प्रक्रियेच्या सर्व टप्प्यातील माहिती परिपुर्ण भरुन विहीत परिक्षा शुल्क भरलेल्या उमेदवारांची स्थिती, परीक्षेची रुपरेषा/ वेळापत्रक / परीक्षार्केद्र/ बैठक क्रमांक इत्यादी बाबतची माहिती वर दिलेल्या (वेबसाईट) वर उपलब्ध राहील. यासंबंधी स्वतंत्र पत्रव्यवहार केला जाणार नाही. सबब सदर संकेतस्थळाला भरतीप्रक्रीये दरम्यान वेळोवेळी भेट देऊन भरती प्रक्रीयेची माहिती/ कार्यक्रमाबाबत अद्ययावत राहण्याची, प्रवेशपत्रे डाऊनलोड करुन घेण्याची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील.

२. ऑनलाईन अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे ऑनलाईन परीक्षेस बोलविण्याचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला आहे असे नाही.

३. उमेदवारांनी यापुर्वी जरी त्यांचे नांव रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्राकडे (सेवायोजन कार्यालयाकडे) नोंदविले असले तरीही त्यांनी/ तिने या पदाच्या अधिकृत संकेतस्थळावर स्वतंत्रपणे विहित शुल्कासहीत ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक आहे.

४. निवडीच्या कोणत्याही टप्प्यावर (निवड प्रक्रीया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी) अर्जदार विहित अर्हता धारण न करणारा आढळल्यास, ऑनलाईन अर्जात दिलेली माहिती / अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास शासनाची दिशाभुल केल्यामुळे त्यांच्यावर योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. तसेच एखाद्या अर्जदाराने त्याच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष/ अप्रत्यक्ष दबाव आणल्यास अथवा गैरप्रकाराचा अवलंब केल्यास त्यास निवड प्रक्रीयेतून वगळण्यात येईल व नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पुर्वसुचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येऊन त्याच्या विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

५. उमेदवारास ऑनलाईन परिक्षा व कागदपत्रे पडताळणीकरीता स्वखर्चाने यावे लागेल.

६. उमेदवारांना त्यांचे गुण वैयक्तिकरित्या पडताळणी करण्याकरिता प्रश्नांची उत्तरतालीका परीक्षा झालेल्या दिवसापासुन साधारणपणे आठवडयाभराच्या कालावधीमध्ये उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येईल.

७. ऑनलाईन परीक्षेचे ठिकाण वेळ, दिनांक उक्त संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येतील. परिक्षेचे प्रवेशपत्र उक्त संकेतस्थळावरुन स्वतः डाऊनलोड करुन प्रिंट काढून ठेवण्याची जबाबदारी सर्वस्वी उमेदवाराची असेल, प्रवेशपत्र इतर कोणत्याही पध्दतीने उमेदवारास पाठविले जाणार नाही. डाऊलोड केलेल्या प्रवेशपत्रावर दिलेल्या सूचनांनुसार स्वतःचा पासपोर्ट आकाराचा फोटो चिकटवावा. तसेच प्रवेशपत्रावरील घोषणापत्रावर स्वतःची स्वाक्षरी करावी. कोणत्याही परिस्थितीत परीक्षा झाल्यानंतर प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याची सुविधा उपलब्ध राहणार नाही, याची नोंद घ्यावी.

८. परीक्षेच्यावेळी उमेदवाराने स्वतःचे प्रवेश प्रमाणपत्र व फोटो ओळखपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

९. परीक्षेस येतेवेळी ओळखीच्या पुराव्यासाठी स्वतःचे आधारकार्ड, निवडणुक आयोगाचे ओळखपत्र, पासपोर्ट किंवा पॅनकार्ड यापैकी किमान कोणतेही एक मुळ ओळखपत्र तसेच मुळ ओळखपत्राची रंगीत छायांकित प्रत सोबत आणणे अनिवार्य आहे.

१०. नावामध्ये बदल केलेला असल्यास विवाह निबंधक यांनी दिलेला दाखला (विवाहित स्त्रियांच्या बाबतीत) नावात बदल झाल्यासबंधी अधिसूचीत केलेले राजपत्रित अधिकारी यांच्याकडून नावात बदल झाल्यासबंधीचा दाखला व त्याची छायांकित प्रत परीक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे.

११. उमेदवाराची ऑनलाईन परीक्षा ही त्यांनी ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या माहितीच्या आधारे गृहीत पात्रतेनुसार कोणतीही कागदपत्रे पुर्वतपासणी / छाननी न करता घेतली जाणार असल्यामुळे या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेदवाराला निवडीबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाहीत. कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवारांची पात्रता निश्चित करण्यात येईल. ऑनलाईन परीक्षेच्या प्राथमिक गुणवत्तेच्या आधारे, उमेदवारांनी ऑनलाईन

अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार अंतरीम यादी प्रसिध्द करुन उमेदवारांच्या कागदपत्रांची सखोल छाननी केली जाईल. सदर प्रक्रियेत उमेदवार अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतुन वगळण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेदवारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपुर्ण अधिकार आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे-६७ यांचेकडे राखुन ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवाराची कोणतीही तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

**(१० ) अंतिम निवड :-** महापरिक्षा पोर्टलवर फक्त उमेदवारांनी ऑनलाईन परिक्षेत प्राप्त केलेले गुण दर्शविण्यात येतील. या पोर्टलवर गुणवत्ता यादी किंवा निवड यादी प्रसिध्द करण्यात येणार नाही.

अ) उमेदवाराची अंतिम निवड ही ऑनलाईन परीक्षेत मिळालेले गुण तसेच आरक्षण व कागदपत्रांची पडताळणी यावर आधारीत केली जाईल.

ब) एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. प्राणिमं/२१५/ (प्र.क्र.५५) १५) १३-अ, मंत्रालय, मुंबई, दिनांक ०५.१०.२०१५ मध्ये नमुद केलेल्या तरतूदी प्रमाणे निवड केली जाईल.

**(११) विशेष सुचना :-**

१ पशुधन पर्यवेक्षक व परिचर या संवर्गातील अंतिम निवड झालेल्या उमेदवारांना पशुसंवर्धन विभागाचे सेवाप्रवेश नियम व सेवा शर्ती लागू राहतील.

२ शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदली करीता महाराष्ट्र बदली अधिनियम- २००५ मध्ये नमुद करण्यात आलेल्या तरतूदींच्या अनुषंगाने कारवाई करण्यात येईल. विनियम व शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम २००५ तसेच सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.एसआरव्ही-२०१०/प्र.क्र.२०१०/१०/१२, दि.०३.०६.२०११ मधील निर्देशानुसार अन्यत्र बदलीच्या तरतूदी लागू राहतील.

३ शासन निर्णय वित्त विभाग क्र.अनियो/१०/०५/१२६/सेवा-४, दिनांक ३१/१०/२००५ नुसार दि.१ नोव्हेंबर, २००५ रोजी व त्यानंतर निवड होणाऱ्या उमेदवारांना नवीन परिभाषीत अंशदान निवृत्ती वेतन योजना लागू राहील. त्यांना सध्या अस्तित्वात असलेली निवृत्ती वेतन योजना (म्हणजे म.ना.सेवा (निवृत्तीवेतन) नियम १९८२ व म.ना.से. (निवृत्ती वेतनाचे अंशराशीकरण) नियम १९८४) आणि सद्या अस्तित्वात असलेली सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी योजना लागू होणार नाही.

४ सामान्य प्रशासन विभाग अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र. क्र.१७/२०००/१२, दि. २८ मार्च, २००५ व शासन परिपत्रक क्र.एसआरव्ही-२०००/प्र. क्र.१७/२०००/१२, दि.०१ जुलै, २००५ नुसार विहीत केल्यानुसार व महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये शासनाने गट-अ ते गट-ड मधील सेवा प्रवेशासाठी प्रतिज्ञापन नमुना (अ) आवश्यक अर्हता म्हणून विहीत नमुन्यातील लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र सादर करणे आवश्यक आहे.

५ शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर सबंधित उमेदवाराने सहा महिन्याच्या आत वैद्यकिय दृष्टया सक्षम असल्याचे जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकिय अधिकाऱ्याकडून शासकीय सेवेत काम करण्यास पात्र असल्याचे वैद्यकिय प्रमाणपत्र नियुक्ती झालेल्या कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

६ शासकीय सेवेमध्ये नियुक्त झाल्यानंतर सबंधित उमेदवारांची नेमणूक त्यांचे पुर्वचारित्र्य व वर्तणुक (पोलीस (Police inquiry) यांच्या समाधानकारक तपासणी अहवालावर अवलंबून राहील व तसा अहवाल आक्षेपार्ह असल्यास कोणतीही पुर्वसूचना न देता त्यांना सेवेतून काढून टाकण्यात येईल.

७ **मागासवर्गीय आरक्षण :-** विमुक्त जाती-अ, भटक्या जमाती-ब, भटक्या जमाती-क, भटक्या जमाती-ड इतर मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागास (एसईबीसी), आर्थिकदृष्टया दुर्बल (ईडब्ल्यूएस)

आणि विशेष मागास प्रवर्गामधील उमेदवारांनी ते उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे सक्षम अधिकाऱ्याचे दिनांक ३१.३.२०१८ अखेरचे मुळ नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र (Non Creamy Layer Certificate) तसेच जात प्रमाणपत्राची साक्षांकित छायाप्रत कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल. ज्या उमेदवारांची निवड विशिष्ट मागासप्रवर्गासाठी आरक्षित असलेल्या जागेवर झालेली आहे, अशा उमेदवारांस त्यांच्या जात प्रमाणपत्र वैधता तपासण्याच्या अधिन राहून तात्पुरती नियुक्ती देण्यात येईल. नियुक्ती आदेश प्राप्त झाल्यानंतर अशा उमेदवाराने नियुक्ती आदेशाच्या दिनांकापासून सहा महिन्याच्या आतमध्ये आपल्या जात प्रमाणपत्राची वैधता सबंधित जात पडताळणी समितीकडून करुन घेणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांची निवड जात प्रमाणपत्रा अभावी रद्द करण्यात येईल. (सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.बीसीसी-२०११ / प्रक्र.१०६४/२०११/१६-ब, दिनांक १२/१२/२०११)

१. सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (एसईबीसी) वर्गातील उमेदवरांकरीता शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२०१८/प्र.क्र.१३०/मावक, दि. ७.१२.२०१८ अन्वये विहीत करण्यात आलेले जातीचे प्रमाणपत्र कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करणे आवश्यक राहील. तसेच शासन निर्णय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२०१३/ प्र.क्र.३५/मावक, दि. १५.७.२०१४ अन्वये शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागासवर्गातील (ईएसबीसी) देण्यात आलेली जात प्रमाणपत्रे सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्गातील (ईएसबीसी) आरक्षणाकरीता ग्राहय धरण्यात येईल.

२. अराखीव (खुला) उमेदवारांकरीता विहीत केलेल्या वयोमर्यादा तसेच इतर पात्रता विषयक निकषासंदर्भातील अटींची पुर्तता करणाऱ्या सर्व उमेदवारांचा (मागासवर्गीय उमेदवारांसह) अराखीव (खुला) सर्वसाधारण पदावरील शिफारशीकरीता विचार होत असल्याने, सर्व आरक्षीत प्रवर्गातील उमेदवारांनी त्यांच्या प्रवर्गासाठी पद आरक्षित/उपलब्ध नसले तरी अर्जामध्ये त्यांचा मुळ आरक्षीत प्रवर्गासंदर्भातील माहिती अचुकपणे नमूद करणे बंधनकारक आहे.

३. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकासाठीचे पात्रता प्रमाणपत्र शासन निर्णय दि. १२.०२.२०१९ या दिनांकापासून किंवा अर्ज सादर करण्याच्या दिनांकापासून सहा महिने यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापर्यन्त सादर करणे आवश्यक राहील. (सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. राआधो-४०१९/प्र.क्र.३१/१६-अ, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १२.०२.२०१९)

८ **महिलांसाठी आरक्षण :-** महिला व बाल विकास विभाग शासन निर्णय क्र. ८२/२००१/ मसेआ/२०००/प्र.क्र.४१५/का-२, दिनांक २५ मे, २००१ मधील तरतूदीनूसार महिलांसाठी संबंधित सामाजिक प्रवर्गाअंतर्गत ३० टक्के समांतर आरक्षण अनुज्ञेय राहील. तथापि, संबंधित प्रवर्गातील महिला उमेदवार उपलब्ध न झाल्यास त्यासाठी आरक्षित असलेली पदे इतरत्र अदलाबदल न करता त्या त्या प्रवर्गातील गुणवत्तेनुसार पात्र पुरुष उमेदवारांमधून भरण्यात येतील. खुल्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/कुटुंबातील (क्रिमिलेअर) महिला सदस्यांना महिलांसाठी असलेले ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, शैक्षणिक व सामाजिकदृष्टया मागास प्रवर्ग आणि आर्थिकदृष्टया दुर्बल या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती अथवा गटातील महिला सदस्यांना ३० टक्के आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार आरक्षणा अंतर्गत अर्ज करणाऱ्या महिला उमेदवारांनी वर्ष २०१७-१८ कालावधी करीताचे व वैध असलेले उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे नॉनक्रिमिलेअर प्रमाणपत्र कागदपत्र तपासणीच्या वेळी सादर करणे आवश्यक आहे. तसेच ज्या महिला उमेदवारांना महिला आरक्षणाचा लाभ हवा असेल त्यांनी तशी मागणी ऑनलाईन अर्जात करणे आवश्यक आहे. नॉनक्रिमिलेअर

प्रमाणपत्राची व पात्रतेची आयुक्त, महिला व बाल विकास विभाग, पुणे यांच्याकडून पडताळणी करण्यात येईल व तदनंतरच पात्र उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल.

९ **खेळाडूंसाठी आरक्षण :-** १. खेळाडूंसाठी असलेले समांतर आरक्षण, शासन, शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र.राक्रिधो-२००२/ प्र.क्र.६८/क्रियुसे-२, दि. ०१.०७.२०१६ मधील व शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयातील तरतूदी नुसार राहतील. त्यांचेकरीता उच्च वयोमर्यादा कमाल ५ वर्षापर्यन्त शिथीलक्षम राहील, तथापि, वयोमर्यादेत ५ वर्षासाठी वयाची अट शिथील करताना कोणत्याही प्रवर्गाच्या उमेदवारांची उच्चतम वयोमर्यादा ४३ वर्ष राहील. विभागीय उपसचांलक, क्रिडा व युवक सेवा महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील प्रमाणपत्र पडताळणी नंतर नियुक्तीचे आदेश देण्यात येतील.

२. खेडाळूने अर्ज करताना खेळाडूने राज्य/राष्ट्रीय स्पर्धेची प्रमाणपत्रे विभागीय उपसंचालकांकडून प्रमाणित करुन घेणे आवश्यक आहे व सदर पडताळणी प्रमाणपत्राची प्रत अर्जासोबत जोडल्याशिवाय उमेदवाराच्या अर्जाचा खेळाडू संवर्गातून विचार होणार नाही.

३. दि. ०१.०७.२०१६ च्या शासन निर्णयामधील तरतूदी नुसार खाली नमूद केलेल्या गट-क साठी पात्र क्रिडा स्पर्धा खालील प्रमाणे-

गट-अ व गट-ब पदाकरीता विहीत केलेली खेळ विषयक अर्हता धारणा करणारा खेळाडू

अथवा

१. राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा कनिष्ठ गट- अ) राष्ट्रीय ज्युनिअर गट अजिंक्यपद स्पर्धा
२. राज्यस्तर वरिष्ठ क्रिडा स्पर्धा- अ) राज्यस्तर वरिष्ठ गटातील अजिंक्यपद स्पर्धा
३. राज्यस्तर शालेय क्रिडा स्पर्धा
४. राज्यस्तर ग्रामिण व महिला क्रिडा स्पर्धा
५. राज्यस्तर आंतरविद्यापीठ स्पर्धा (अश्वमेघ)
६. राज्यस्तर आदिवासी क्रिडा स्पर्धा
७. राज्यस्तर पॅराऑलिम्पिक क्रिडा स्पर्धा
८. राज्यस्तर अपंग क्रिडा स्पर्धा

टिप :- वरील अ.क्र.१ ते ५ मधील सर्व क्रिडा स्पर्धा मधील खेळ हे ऑलंपिक क्रिडा स्पर्धा, एशियन गेम्स आणि कॉमनवेल्थ गेम्स मध्ये समावेश असलेले खेळ व बुध्दिबळ तसेच कब्बडी व खो-खो हे देशी खेळच ५ टक्के खेळाडू आरक्षणासाठी अनुज्ञेय असतील.

१० **अनाथ आरक्षण :-** शासन निर्णय, महिला व बालविकास विभाग क्र. अमुजा-२०११/प्र.क्र.२१२/का-३, दिनांक २.४.२०१८ मधील तरतूदी नुसार, अनाथ मुलांसाठी असलेल्या राखीव पदांसाठी अर्ज करताना उमेदवाराकडे, महिला व बालविकास विभागाकडून देण्यात येणारे अनाथ प्रमाणपत्र उमेदवाराकडे पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील. अनाथ आरक्षण प्रमाणपत्राच्या अनुषंगाने एखाद्या उमेदवाराची नोकरीमध्ये नियुक्ती झाल्यास त्याने/तिने सादर केलेल्या अनाथ प्रमाणपत्राची फेर तपासणी आयुक्त, महिला व बालविकास विभाग, पुणे यांचेमार्फत करणे आवश्यक राहील.

११ **भुकंपग्रस्त / प्रकल्पग्रस्त आरक्षण :-**भुकंपग्रस्त/प्रकल्पग्रस्त उमेदवारांनी सक्षम प्राधिकारी/ जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांनी दिलेले प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहील. भुकंपग्रस्त उमेदवारांसाठी राखीव असलेली पदे लातूर/ उस्मानाबाद जिल्हयातील बाधीत गावातील भुकंपग्रस्त उमेदवारातून भरण्यात येतील.

तसेच साप्रवि शासन निर्णय दि.०४/११/२०१६ मध्ये नमुद केल्यानुसार,भुकंपग्रस्तांचे पात्र उमेदवार उपलब्ध झाले नाहीत, तर ती पदे प्रकल्पग्रस्तांसाठी वापरण्यात येतील.

१२ **अंशकालीन कर्मचारी समांतर आरक्षण :-** सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.पअंक-१००९/ प्र.क्र.२००/२००९/१६-अ, दि. २७.१०.२००९ अनुसार पदवीधर/पदवीकाधारक अंशकालीन सुशिक्षीत बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजने अंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये तीन वर्षापर्यन्त दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या उमेदवारांना सरळ सेवेने करावयाच्या नियुक्त्यामध्ये १० टक्के समांतर आरक्षण लागू करण्यात आले आहे. तसेच ३ वर्षापेक्षा कमी अनुभव असलेल्या उमेदवारास अंशकालीन या समांतर आरक्षणातून शासकीय सेवेत नियुक्ती देता येणार नाही याची नोंद घ्यावी.

१३ **माजी सैनिक आरक्षण :-** १. माजी सैनिक उमेदवारांनी जिल्हा सैनिक बोर्डात नाव नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. सदर प्रमाणपत्र, कागदपत्रे पडताळणीच्या वेळी सादर करावे लागेल. तसेच सशस्त्र दलातील किमान ६ महिने सेवा केलेल्या माजी सैनिका मधील त्यांनी सशस्त्र दलात केलेला अखंड सेवाकाल अधिक ३ वर्षे एवढा काल त्यांच्या विहीत दिनांकाच्या वयातून वगळून त्या दिनांकास येणारे त्यांचे वय विचारात घेतले जाईल. अपंग माजी सैनिकांसाठी वयोमर्यादा ४५ वर्षे पुर्णपेक्षा अधिक नसावी. माजी सैनिकांसाठी विहीत वयोमर्यादेतील सवलत, सामान्य प्रशासन विभाग, शासन शुध्दीपत्रक क्र.मासैक-१०१०/ प्र. क्र.२७९ / १०/१६-अ, दिनांक २० ऑगस्ट, २०१० प्रमाणे राहील.

२. शासन परीपत्रक पीआरअे-२००४/३८५५/प्रशा-१.१, दिनांक २ जुन, २००५ नुसार माजी सैनिक या समांतर आरक्षणामध्ये युध्द काळात व युध्द नसताना सैनिक सेवेत मृत्यू झालेल्या किंवा अपंगत्व येऊन त्यामुळे नोकरीसाठी अयोग्य झालेल्या माजी सैनिकांच्या कुटूंबातील फक्त जवान किंवा अपंग जवानाची पत्नी यांना नियुक्ती देण्याचे धोरण आहे. त्यानंतर त्यांची अविवाहीत मुलगी/ मुलगा यांचा समावेश आहे व त्यांचा १५ टक्के समांतर आरक्षणामधुन विचार करण्यात येईल.

३. सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.मासैक-१०१२/प्र.क्र.१९८/१६-अ/मंत्रालय, मुंबई, दि.३०/४/२०१३ तरतूदीनुसार अर्ज करण्याची सवलत अनुज्ञेय राहील.

१४ **शासकीय व निमशासकीय कर्मचारी :-** यांना वयोमर्यादेतील कोणत्याही प्रकारची सूट दिलेली नाही. सदरील पद भरती करीता घेण्यात येणाऱ्या ऑनलाईन परीक्षेमध्ये अर्ज करावयाचे असल्यास तो त्यांच्या विभाग प्रमुखांच्या परवानगीने विहित मार्गाने विहित मुदतीत भरणे आवश्यक राहील. परवानगीची प्रत कागदपत्र छाननीचेवेळी सादर करावी अन्यथा त्यांची निवड रद्द करण्यात येईल.

१५ **समान गुण आणि आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे पाल्य :-** शासन सामान्य प्रशासन विभाग पुरकपत्र क्र.प्रानिमं-२०१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ मधील तरतुदीनुसार, लेखी परीक्षेमध्ये समान गुण मिळालेल्या उमेदवारांचा गुणवत्ता यादीत समावेश करताना त्यामध्ये आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांच्या पाल्यास प्रथम प्राधान्यक्रम देण्याच्या शासनाच्या धोरणानुसार अशा उमेदवारांकडे अर्ज करतेवेळी, सबंधित जिल्हास्तरीय समितीने त्यास कुटुंबातील मृत शेतकऱ्याचा पाल्य म्हणून पात्र ठरविल्याबाबतच्या पत्राचा क्रमांक व दिनांक असणे आवश्यक राहील. सदरहू मुळ पत्र उमेदवाराने कागदपत्र पडताळणीचे वेळी पडताळणी समितीस उपलब्ध करुन देणे आवश्यक राहील.

एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास अंतिम निवड सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र.प्रानिमं-१२१५/(प्र.क्र.५५/१५)/१३-अ, दिनांक ५.१०.२०१५ व शासन निर्णय पुरकपत्र क्र.प्रानिम-१२१७/(प्र.क्र.९२/१७)/१३-अ, दि.२.१२.२०१७ मध्ये नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे निवडयादी केली जाईल.

१६ **अपंग (विकलांग) आरक्षण :-** अंपगांचे आरक्षण महाराष्ट्र शासन सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग परिपत्रक क्र.न्यायाप्र-२०११/प्र.क्र.१२९/सुधार-३, दिनांक ०४/०८/२०११ व कृषि पशुसंवर्धन दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग, शासन आदेश क्र.पसंप्र-२०११/प्र.क्र.४, पदुम-१, मंत्रालय, मुंबई, दिनांक १० जानेवारी, २०१२ मधील तरतुदीनुसार गट-अ ते गट-ड मधील पदांवर सरळसेवेने अपंगांच्या नियुक्तीसाठी निश्चित केलेल्या पदांची यादी निर्देशित केलेली असून, त्या अनुषंगाने सदरील पद भरती करण्यात येत आहे. तसेच विकलांग प्रवर्गातील उमेदवारांचे विकलांगतेचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक असून, विकलांगतेचा फायदा घेऊ इच्छिणाऱ्या उमेदवारांनी शासन निर्णय सार्वजनिक आरोग्य विभाग क्र. अप्रवि-२०१२/प्र.क्र.२९७/आरोग्य-६, दिनांक ६.१०.२०१२, शासन निर्णय क्र.अप्रवि-२०१८/प्र.क्र.४६/आरोग्य-६, दि. १४.९.२०१८ मधील आदेशानुसार केंद्र शासनाच्या www.swavlambancard.gov.in या संगणकीय प्रणालीद्वारे वितरीत करण्यात आलेले नवीन नमुन्यातील दिव्यांगत्वाचे प्रमाणपत्र कागदपत्रे पडताळणीचे वेळी सादर करणे आनिवार्य आहे. दिव्यांग व्यक्तीसाठी आरक्षित पदावर शिफारस करताना उमेदवार कोणत्या सामाजिक प्रवर्गातील आहे याचा विचार न करता दिव्यांग गुणवत्ता क्रमांकानुसार त्याची शिफारस करण्यात येईल.

१७ **लेखनिक (Scribe) ची मदत घेणाऱ्या उमेदवारांसाठी सूचना :-**

१) अर्जदाराला लेखनिकाची आवश्यकता असल्यास तशी विनंती आपल्याला अर्जामध्ये करावी लागेल.

२) उमेदवारास लेखनिकाची सोय स्वत: करावी लागेल.

३) उमेदवाराने अर्जामध्ये विनंती केली असल्यास प्रवेशपत्रा सोबत (हॉल तिकिट) उमेदवारास लेखनिक घोषणापत्र **(Scribe declaration form)** मिळेल. उमेदवारास लेखनिक घोषणापत्र राजपत्रित अधिकाऱ्याकडून ते प्रमाणित करुन परीक्षेला आणावे लागेल.

४) लेखनिकाची मदत घेणाऱ्या उमेदवारास नियमानुसार प्रत्येक तासाला २० मिनिटाचा जादाचा कालावधी दिला जाईल.

१८. पदभरतीच्या अधिसूचना, शासन निर्णय व परिपत्रके आवश्यकतेनुसार महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावरुन उमेदवाराने स्वत: उपलब्ध करुन घ्यावीत.

सदरची जाहीरात महापरीक्षा कक्षाच्या www.mahapariksha.gov.in या ऑनलाईन पोर्टलवर प्रसिध्द करण्यात येत आहे.

अर्जदारांना अर्ज भरण्यासंबंधी काही अडचण असल्यास त्यासाठी email id: enquiry@mahapariksha.gov.in या आणि टोल फ्री नं. १८००-३०००-७७६६ या क्रमांकावर संपर्क करावा.

(लक्ष्मीनारायण मिश्रा)
आयुक्त पशुसंवर्धन
महाराष्ट्र राज्य, पुणे-६७.

दिनांक : २७/०२/२०१९
ठिकाण: पुणे-६७